REGISTERED No. B. 3434





# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख २३ एप्रिल १९४७ | अंक १७




पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
|---|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | | राजा ( एक बैली ) |

' मधुकर ' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

## विविध माहिती

**ब्रिटन-रशिया व्यापारी वाटाघाटी**—ब्रिटन आणि रशिया यांच्यांतील व्यापारासंबंधीं बोलणीं करण्यासाठी ब्रिटनचे परदेशीय व्यापाराचे चिटणीस मॉस्कोला जाणार आहेत. रशियाकडून ब्रिटनला लाकूड व इतर कच्चा माल यांची जरूरी आहे. उलट ब्रिटनकडून रशियाला विजेच्या कारखान्याची व इतर यंत्र सामुग्री हवी आहे.

**हिंदुस्थानची पौंडी गंगाजळी**—युद्धकाळांत ब्रिटनमध्यें सांठलेल्या पौंडी गंगाजळीच्या परतफेडीसंबंधीं निर्णयात्मक बोलणीं लंडनमध्यें मे महिन्याच्या १५ तारखेनंतर चालू होणार आहेत असें समजतें. ब्रिटनतर्फें फडणीस डॉ. डाल्टन व हिंदुस्थानतर्फें मि. लिआकत अली खान हे प्रमुख म्हणून वाटाघाटी करतील. युद्धासाठी ब्रिटननें केलेला खर्च परत करण्याचा अगर कर्जांत सूट देण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार नाहीं.

**हिंदुस्थानांत अणु-संशोधन**—त्रावणकोर संस्थानांत अणुशक्तीच्या संशोधनांत महत्त्व असलेली 'मोनझानाइट सँड' भरपूर आहे. या वाळूचा उपयोग अणु-संशोधनासाठीं करण्यासाठीं त्रावणकोर सरकारनें हिंदुस्थान-सरकारला परवानगी दिली आहे. संशोधनासाठी केंद्र मुंबईत उभारण्यांत येणार असून त्यासाठी सुमारे ५० लाख रुपये खर्च येईल. हा खर्च हिंदुस्थान सरकार करणार आहे. केंद्राचे प्रमुख डॉ. भाभा होतील.

**मद्रास शहरासाठी घरांची योजना**—मद्रास सरकारचे मंत्री डॉ. डॅनिअेल थॉमस यांनीं शहरांत व शहराजवळ रहाणाऱ्या लोकांसाठी सहकारी तत्वावर एक योजना आखली आहे. या योजनेंत मध्यम वर्गीय लोकांनीं सहकारी तत्त्वावर घरें बांधणारी संस्था काढण्याची कल्पना मुख्य आहे. संस्थेच्या सभासदांनीं व्यक्तिशः घरासाठी होणाऱ्या खर्चापैकीं एक पंचमांश द्यावा व उरलेला संस्थेनें द्यावा अशी ही योजना आहे. जागा सरकार मिळवून देणार आहे.

**१ कोटी, ७५ लाख रुपयांची नुकसान भरपाईची मागणी**—सिंध सरकारचे एक माजी अधिकारी खा. ब. गॅबाली सिंध सरकारकडे १ कोटी, ७५ लाख रुपयांची नुकसान भरपाईची मागणी करणार आहेत. सिंधमधील ड्रिघ विमानतळाची ५०० एकर जागा सरकारनें त्यांच्या कडून ५० रु. एकरास १९२८ सालीं घेतली होती. सध्यां या जागेची किंमत एकरामागें २५ हजार रुपये लागत असल्यानें त्यांनीं वरील नुकसान भरपाई मागण्याचें ठरविलें असल्याचें समजतें.

**हैद्राबादमधील विणकरांची सहकारी संघटना**—कापड आणि सूत यांच्यावरील नियंत्रणें दूर झालीं म्हणजे विणकरांच्या धंद्याला धोका उत्पन्न होईल. तो टाळण्यासाठी हैद्राबाद संस्थानांतील विणकर कामगारांची एक सहकारी संस्था स्थापन करण्याचें निजाम सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी प्राथमिक भांडवल ५० लाख रुपये लागेल. संस्थेचा कारभार विणकरांनीं निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत चालणार आहे.

**कापडाच्या गिरण्या आणि मद्रास सरकार**—दक्षिण हिंदुस्थानांतील व्यापारी संघटनेची वार्षिक बैठक नुकतीच झाली. मद्रास सरकारनें खादीच्या उत्पादनाला दिलेलें उत्तेजन योग्य असून कापडाच्या गिरण्यांनाहि मारक धोरण न स्वीकारल्याबद्दल संघटनेच्या अध्यक्षांनीं आनंद व्यक्त केला. ग्रामोद्योगाच्या व्यवसायाला देशाच्या अर्थ व्यवस्थेंत योग्य स्थान आहे; परंतु त्या व्यवसायास सर्व मागणी पुरविता येईल असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीकडे डोळेझांक करण्यासारखें होईल असें ते म्हणाले.

**कोचीनमध्यें मिठावरील कर रद्द**—कोचीन दरबारनें एक हुकूम काढून मिठावरील कर ता. १५ एप्रिलपासून रद्द केला आहे. मिठाची किंमत मणाला २ रुपये ठेवण्यांत आली आहे.

**ट्रुमन यांच्या धोरणावर रशियाची टीका**—सुरक्षितता समितीवरील प्रतिनिधी एम्. ग्रॉम्यूको यांनीं ग्रीस-तुर्कस्थानला अमेरिकेनें देऊं केलेल्या आर्थिक मदतीवर कडक टिका केली. संयुक्त राष्ट्र संघटनेला डावलून या राष्ट्रांना एकपक्षीय मदत देण्याच्या आपल्या योजनेवर संयुक्त राष्ट्र संघटनेचा शिक्का चढविण्याचा अमेरिका प्रयत्न करीत आहे असें ते म्हणाले. या प्रकरणांत मि. व्हॅंडेन बर्ग यांच्या उपसूचनांचाहि त्यांनीं समाचार घेतला.

**भातकल बंदराचें महत्त्व**—म्हैसूर संस्थानांतील व्यापाराची वृद्धि करण्याच्या दृष्टीनें भातकल बंदराचे मोठ्या बंदरांत रूपांतर करणें अगत्याचें आहे असें मत हिंदुस्थान सरकारच्या बंदर कमिटीनें व्यक्त केलें आहे. भातकल म्हैसूर संस्थानाच्या सरहद्दीपासून १५ मैलावर आहे. हें बंदर मोठें आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीनें म्हैसूर सरकार व मुंबई सरकार यांच्यांत १९१६ पासून वाटाघाटी चालू होत्या.

**हिंदुस्थान-चीन व्यापारी तह**—हिंदुस्थान व चीन यांच्यांत व्यापारी तह घडवून आणण्यासाठी नॅन्किंगमधील हिंदी वकील श्री. मेनन यांच्यामार्फत चीनच्या सरकारनें बोलणीं सुरू केलीं आहेत. या करारांत नौकानयनाचाहि विचार करण्यांत यावयाचा आहे. या तहाच्या तपशिलाचा विचार हिंदुस्थान सरकारतर्फें सुरू आहे.

**विमानानें पृथ्वी-प्रदक्षिणा**—शिकॅगो येथील जगप्रसिद्ध फौंटन-पेन्सचे कारखानदार मि. रेनॉल्डस हे सध्या 'बॉंबशेल' नामक आपल्या विमानांतून पृथ्वी-प्रदक्षिणा करीत आहेत. कैरो ते कराची हा प्रवास त्यांच्या दोन इंजिनें असलेल्या विमानानें ६ तास २० मिनिटांत पूर्ण केला.

**विमानांमधून धान्याची पेरणी**—ब्रिटनमध्यें नुकत्याच होऊन गेलेल्या पुरानें धान्य-परिस्थिति बिकट होईल. अन्नधान्याची निर्मिति भरून काढण्यासाठी ब्रिटनचे शेतकी खातें विमानांतून पेरणी करण्याच्या एका योजनेचा विचार करीत आहे.

**हिंदुस्थानांत टिनची चोरटी आयात**—चीन, मलाया आणि सयाममधून हिंदुस्थानांत कांहीं प्रकारच्या टिनची चोरटी आयात होत आहे असा समज लंडनमध्यें पसरला आहे. यांपैकीं कांहीं परत विकलें जात असलें तरी कांहीं हिंदुस्थानांतच वापरण्यांत येत असावें. कारण जागतिक टिन नियंत्रक मंडळानें हिंदुस्थानला टिनचा फार थोडा वांटा दिला आहे असें निमित्त सांगण्यांत येत आहे.

**दक्षिण ध्रुव प्रदेशाचा नकाशा बदलला पाहिजे**—दक्षिण ध्रुव प्रदेशांचें संशोधन करण्यास गेलेली अमेरिकन मोहिम परतली असून, मोहिमेंत लागलेल्या शोधामुळें या प्रदेशाचा नकाशा नव्यानें काढावा लागेल. जगांतील जरूरीपेक्षां अधिक पिकलेली अन्नसामुग्री या प्रदेशांत नेऊन ठेवली तर ती न नासतां तशीच राहील व त्यामुळें एकाद्या वर्षीं नापीक झाल्यास या सांठ्यामधून अन्नाचा पुरवठा करता येईल असें मत ॲडमिरल बर्ड यांनीं व्यक्त केलें आहे.

**हिंदी खनिजांना अमेरिकन मागणी**—अमेरिकेनें युद्धकालांत शिसें व इतर कांहीं खनिज द्रव्यांचा भरमसाट उपयोग केल्यामुळें कांहीं खनिज धातूंची तेथें चणचण आहे. अमेरिकन शेतकऱ्यानें पिकविलेल्या धान्याला हिंदुस्थानची बाजारपेठ आणि हिंदी खनिज द्रव्यांना अमेरिकन बाजारपेठ अशी सांगड घालतां येईल असें मत अमेरिकेच्या शेतकी खात्याच्या चिटणिसांनीं व्यक्त केलें आहे.

अर्थ

बुधवार, ता. २३ एप्रिल, १९४७




संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

प्रा. वा. गो. काळे

## जिनेव्हा परिषद व हिंदी शिष्टमंडळाची जबाबदारी

अमेरिकेतर्फे आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेची घटना निश्चित करण्यासाठीं जगांतील प्रमुख अठरा राष्ट्रांच्या प्रतिनिधींची बैठक एप्रिलमहिन्यांत जिनेव्हा येथें भरविण्यांत येत आहे. ह्या परिषदेची पूर्व तयारी करण्यासाठीं लंडन येथें जानेवारी महिन्यांत अशीच एक आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यांत आली होती व त्या वेळीं जागतिक व्यापारवृद्धीच्या तत्त्वांची चर्चा करण्यांत येऊन, मागासलेल्या राष्ट्रांच्या औद्योगीकरणाला आर्थिक दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांनीं विरोध करूं नये तर शक्य तेथें आपल्या व्यापारी धोरणानें मदत करावी असें हिंदुस्थानचे प्रतिनिधि श्री. नेहरू ह्यांच्या सूचनेवरून मान्य केलें गेलें. हिंदी प्रतिनिधींची कामगिरी औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या देशांच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. नाहींतर अमेरिका-पुरस्कृत जागतिक राष्ट्रांच्या मेळाव्यांत, मागासलेल्या राष्ट्रांच्या परिस्थितीचा कोणीच विचार केला नसता. ह्याचें श्रेय नेहरू–सरकारच्या, राष्ट्रीय हित संभाळणाऱ्या प्रतिनिधींना आहे. जुन्या नोकरशाहीच्या राजवटींत अशा प्रकारें हिंदी हितसंबंधांकडे कोणी लक्ष दिलें नसते.

जानेवारीमध्यें साध्य केलेल्या गोष्टींमुळें फारसें हुरळून जाण्याचें कारण नाहीं. कारण एप्रिलमध्यें भरणाऱ्या अठरा राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या जिनेव्हा येथील परिषदेंत प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करावयाची व जकातींच्या संरक्षक भिंती कमी करून आंतरराष्ट्रीय व्यापार कसा वाढवावयाचा, व असें करतांना निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांचें कल्याण कसें साध्य करावयाचें या बद्दल निश्चित योजना आंखली जाईल. हिंदी जबाबदार व्यक्तींचीं असेंब्लींतील किंवा इतर ठिकाणचीं गेल्या एक दोन महिन्यांतील भाषणें ऐकलीं म्हणजे त्यावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेमुळें पुढील वर्षी किंवा लौकरच हिंदुस्थानला आपल्या जकातींच्या धोरणांत महत्त्वाचा बदल करावा लागेल. त्याचप्रमाणें टॅरिफ बोर्डानेंहि कांहीं धंद्यांची झटपट चौकशी करून संरक्षणाबद्दल शिफारसी केल्या त्याहि तात्पुरत्या एक वर्षापुरत्या केल्या, त्याचेंहि कारण पुढील वर्षी जकातींच्या धोरणांत महत्वाचे फरक करावे लागतील, हें होय.

एप्रिलमध्यें भरणाऱ्या परिषदेचें काम फार नाजुक स्वरूपाचे, आहे, व हिंदी प्रतिनिधींवरील जबाबदारी विशेष आहे. गेल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या 'यूनो', 'आंतरराष्ट्रीय चलन निधी' व 'आंतरराष्ट्रीय बँक' ह्या संस्थांचें सभासदत्व फार मोठ्या रकमा खर्ची घालून हिंदुस्थाननें स्वीकारलेंआहे; व आतां आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना किंवा 'आय. टी.ओ.'ह्यांचें सभासदत्व स्वीकारण्याच्या मार्गावर हिंदुस्थान आहे. हें सभासदत्व खरोखरच कितपत फायदेशीर ठरेल हें भावी इतिहासच सांगूं शकेल. परंतु पुर्वीच्या अनुभवावरून एवढें निश्चित, कीं अशा आंतरराष्ट्रीय संस्था नेहमींच हिंदुस्थानच्या फायद्याच्या असतात असें नव्हे. आंतरराष्ट्रीय चलननिधीनें, स्टार्लिंग बॅलन्सच्या परत फेडीचा प्रश्न निधीच्या कक्षेंत येत नाहीं असा निर्णय दोन वर्षांपूर्वी दिला. हा इतिहास ताजाच आहे. तेव्हां हिंदी प्रतिनिधींनीं आंतरराष्ट्रीयत्वाच्या नांवानें स्वतःची दिशाभूल करून घेतां कामा नये, व जिनेव्हा येथें ठरल्या जाणाऱ्या धोरणाचा बारकाईनें विचार करावा. ता. ११ डिसेंबर १९४६ च्या आमच्या अंकांत 'अमेरिकेचें आंतरराष्ट्रीय व्यापारी धोरण व हिंदुस्थान' ह्या लेखांत श्री. भा. म. काळे ह्यांनीं अमेरिकेचें व्यापारी धोरण कसें स्वार्थमूलक आहे व त्यापासून हिंदुस्थाननें सावध कसें राहिलें पाहिजे "याची चर्चा केली आहे. अर्थशास्त्राचीं सर्व तत्त्वें सापेक्ष असतात व त्यांची अंमलबजावणी विशिष्ट देश आणि काल परिस्थिति लक्षांत घेऊनच केली पाहिजे.

आपला माल इतर देशांच्या बाजारपेठांतून कसा खपेल हा अमेरिकेपुढें प्रश्न आहे. यासाठीं इतर राष्ट्रांना सढळ हातानें कर्जें द्यावयास अमेरिका तयार आहे. इंग्लंडला आपल्या जीवनासाठीं १९३८–३९ च्या मानानें १७५ टक्के किंमतीचा माल आतां निर्यात केला पाहिजे. बाकीच्या जगाची क्रयशक्ति सुधारणें हें इंग्लंड व अमेरिका ह्या दोघांनाहि फायदेशीर आहे. परंतु इंग्लंड किंवा अमेरिका ह्यांचा विक्री माल हा चढाओढीच्या स्वरूपाचा माल आहे. म्हणजे कांहीं विशिष्ट यंत्र सामुग्री वगळल्यास, ह्या विक्री–मालाची मक्तेगिरी ह्या देशांकडे नाहीं. उलट हिंदुस्थानचा मुख्य विक्री-माल म्हणजे चहा, ताग, मॅंगनीझ, अभ्रक, कातडीं, लाख इ. आहे, व ह्या मालाची बऱ्याच प्रमाणांत हिंदुस्थानकडे मक्तेगिरी आहे. म्हणजेच हिंदुस्थानाव्यतिरिक्त इतर देश हा माल जागतिक बाजारपेठेला पुरवूं शकत नाहींत. ह्यावरून असें दिसून येईल कीं आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या देवाण-घेवाण स्वरूपांत हिंदुस्थानची भूमिका निःसंशय मजबूत पायावर उभारलेली आहे. तेव्हां इंग्लंड, अमेरिका इ. राष्ट्रांबरोबर समान तत्वावर व्यापारी धोरणाला संमति देणें हिंदुस्थानाला तोट्याचें ठरेल. आज हिंदुस्थानची मुख्य गरज म्हणजे सर्व तऱ्हेची यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने देशांत निघणें ही होय. ह्या दृष्टीनें यंत्रसामुग्री खरेदी करतां येणें, व जरूर तेथें परकी यांत्रिक तज्ज्ञ कांहीं काळ पर्यंत हिंदुस्थानांत आणणें ह्या दोन गोष्टींवर भर दिला पाहिजे. हिंदी विक्री–माल अशा स्वरूपाचा आहे कीं त्याच्या खपासाठीं कोणत्याही देशाची मनधरणी करण्याचें कारण नाहीं. बाकीचे देश तो माल आपण होऊनच हिंदुस्थानपासून खरेदी करतील हें उघड आहे. प्रो. गांगुली ह्यांनीं हिंदुस्थानच्या युद्धोत्तर परराष्ट्रीय व्यापाराबद्दल गेल्या वर्षी एक विचारप्रवर्तक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांतहि त्यांनीं हिंदी विक्री–मालाची स्थिती कशी मजबूत आहे हें दाखवून दिलें आहे, व जागतिक खुल्या व्यापाराच्या कल्पनेबाबत आपण कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे हें दाखवून दिलें आहे. सध्यांचा काळ असा आहे कीं 'जागतिक सौख्य व आंतरराष्ट्रीयत्व' ह्या गोंडस कल्पनांच्या नावाखालीं जगांतील स्वार्थसाधू राष्ट्रें आपला स्वार्थ चटकन साधतील व हिंदुस्थानसारखा देश त्यांच्या आहारीं जाईल. लंडन परिषदेंत हिंदी प्रतिनिधींनीं योग्य

कामगिरी केली आहे, त्याचप्रमाणें जिनेव्हा परिषदेंतहि राष्ट्रीय दृष्ट्या दक्षता व सावधगिरी बाळगली जाईल अशी आशा आहे.

## बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्ती

### सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

(२)

#### लायसेन्स

बँकिंग कंपन्यांच्या बिलांतील १८ व्या कलमानें, बँकिंगचा धंदा करणाऱ्या सर्व कंपन्यांना लायसेन्स आवश्यक केला आहे, परंतु विद्यमान कंपन्यांनीं पांच वर्षे लायसेन्स काढला नाहीं तरी चालेल अशी त्यांत सवलत दिलेली आहे. ह्या सवलतीची जरूरी नाहीं, असें बिलावरील सिलेक्ट कमिटीनें ठरविलें आहे. प्रत्येक नव्या बँकेनें व्यवहारास प्रारंभ करण्यापूर्वी आणि प्रत्येक विद्यमान बँकेनें कायदा अमलांत आल्यावर सहा महिन्यांचे आंत लायसेन्स-साठीं अर्ज केला पाहिजे, अशी सिलेक्ट कमिटीनें दुरुस्ती सुचविली आहे. रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स देईपर्यंत किंवा तो नाकारीपर्यंत विद्यमान बँका आपला व्यवहार चालू ठेवूं शकतील. १२ व्या कलमास अनुसरून ज्या बँकांना भांडवलाची अट पुरी करण्यास सवड दिलेली असेल, अशा बँकांना लायसेन्स नाकारण्यांत येऊं नये अशी कमिटीची शिफारस आहे. रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स रद्द केला, तर मूळ बिलाप्रमाणें बँकेस मध्यवर्ती सरकारकडे दाद मागण्याचा अधिकार नव्हता, तो आतां त्यास देण्यांत यावयाचा आहे.

#### शाखा

बँकांनी कोठे शाखा उघडाव्या, ह्यावर १९४६ च्या बँकिंग कंपनीज (रिस्ट्रिक्शन ऑफ ब्रँचेस) कायद्यानें नियंत्रण घातलेलेंच आहे. त्यास अनुसरूनच सिलेक्ट कमिटीनें नवें २२ वें कलम बिलांत घातलें आहे. तथापि प्रदर्शन, परिषद, मेळा, इत्यादींचे निमित्त एक महिन्यापुरती तात्पुरती शाखा उघडण्यास ह्या कलमानें प्रतिबंध केलेला नाहीं. ज्या शहरांत, गांवांत अगर खेड्यांत बँकेची कचेरी अगोदरच आहे, अशाच ठिकाणीं तिला ही तात्पुरती शाखा काढतां येईल.

#### रोखीचें प्रमाण

ब्रिटिश हिंदुस्थानांतील एकूण देण्याच्या २५% रक्कम बँकांनीं रोख, सोनें किंवा मान्यता दिलेले असे गहाण न टाकलेले रोखे ह्यांचे स्वरूपांत राखावी, अशी मूळ बिलांत तरतूद आहे. हें प्रमाण २०% वर आणण्यास सिलेक्ट कमिटी तयार आहे.

#### ऑडिटरांचा रिपोर्ट

बँकांच्या हिशेब तपासनीसांनीं अधिक तपशीलवार तपासणीचें काम करावें, असा सिलेक्ट कमिटीचा आग्रह आहे. ह्या दृष्टीनें ऑडिटरनें आपल्या रिपोर्टांत खालील बाबी नमूद केल्या पाहिजेत.

(अ) त्यानें मागितलेली माहिती व खुलासे त्यास समाधानकारक वाटले काय?

(ब) त्याच्या नजरेस आलेले बँकेचे व्यवहार तिच्या अधिकार क्षेत्रांत होते काय?

(क) बँकेच्या शाखांकडून आलेले तक्ते ऑडिटच्या दृष्टीनें पुरेसे तपशीलवार होते काय?

(ड) नफा-तोटा पत्रकांत दाखविलेला नफा-तोटा बरोबर आहे काय?

(इ) आणखी एखादी गोष्ट भागीदारांच्या नजरेस आणण्याजोगी आहे काय?

शाखांचें तपशीलवार ऑडिट होऊं शकत नाहीं आणि हिशेब तपासनिसांना त्यांस दाखविण्यांत येणाऱ्या तक्त्यांवरच विसंबून बसावें लागतें. कांहीं बँकांनीं शाखांचें स्वतंत्र पुरें ऑडिट करविण्याची पद्धत अंगीकारली आहे ती चांगलीच आहे. परंतु, तसें न करणाऱ्या बँकांच्या ऑडिटरवरील जबाबदारी, प्रस्तुत सुधारणेनें निश्चित वाढविली आहे.

#### तपासणी

बँकेचा कारभार असावा तसा नाहीं असें मध्यवर्ती सरकारास वाटलें तर त्यानें बँकेची रिझर्व बँकेमार्फत तपासणी करवावी, हें मूळ कायद्यांतील कलम बँकांना बाधक होण्याचा संभव आहे. एखाद्या बँकेची तपासणी चालू आहे एवढ्यावरून केवळ तिचेसंबंधीं गैरवाजवी निष्कर्ष काढला जाणें योग्य ठरणार नाहीं. ह्या दृष्टीनें, शंका स्वतःस येण्याची वाट न पहातां, रिझर्व्ह बँकेनें कोणत्याहि बँकेची केव्हांहि तपासणी करावी अशी दुरुस्ती सिलेक्ट कमिटीनें सुचविली आहे. तपासणीच्या रिपोर्टासंबंधीं स्वतःची बाजू मांडण्यास बँकांना संधी मिळणें आवश्यक आहे परंतु ती तशी मूळ बिलानें दिलेली नव्हती. सिलेक्ट कमिटीनें ही चूक सुधारली आहे, आणि मध्यवर्ती सरकारनें अशी संधी देण्यास आतां जागा ठेवली आहे. ही संधी देण्यास मध्यवर्ती सरकार बांधलेलें मात्र नाहीं.

#### रिझर्व्ह बँकेस नवे अधिकार आणि तिचें विस्तृत कार्यक्षेत्र

रिझर्व्ह बँकेस प्रस्तुत बिलानें कित्येक नवे अधिकार दिले आहेत, त्याचबरोबर त्या बँकेस सर्व बँकांसंबंधीं खुलासेवार माहिती मिळण्याची आणि त्यांना वेळेवर सहाय करण्याचीहि व्यवस्था होणें जरूर आहे. ३५ व्या नव्या कलमानें रिझर्व्ह बँकेस आणखी अधिकार देऊन तिचें कार्यक्षेत्र वाढविलें आहे. विशिष्ट गोष्ट न करण्याविषयीं ताकीद देणें, सल्ला देणें, एकत्रीकरणास सहाय्य करणें, कर्ज देणें, बँकेची तपासणी झाल्यावर तिच्या डायरेक्टरांची सभा बोलाविणें, व्यवस्थेमध्यें सुधारणा घडवून आणणें, देशांतील बँकिंगच्या प्रगतीबाबत सरकारास वार्षिक रिपोर्ट देणें, बँकांनीं पाठविलेले तक्ते, हिशेब वगैरे तपासण्यासाठी अधिकारी व नोकर नेमणें इत्यादींचा समावेश प्रस्तुत कलमांत होतो.

#### प्रायव्हेट बँकिंग कंपन्या

कंपनी कायद्यांतील १७,७७, ८३ बी, ८६ एच, ९१ बी व ९१ डी आणि १४४ व्या कलमाचें ५ वें उपकलम ह्यांनीं प्रायव्हेट कंपन्यांना दिलेल्या सवलती बँकिंगच्या प्रायव्हेट कंपन्यांना मिळूं नयेत ह्या उद्देशानें ४८ वे नवें कलम बिलांत दाखल करण्यांत आले आहे.

#### रिझर्व्ह बँकेचीं बँकांना कर्जें

रिझर्व बँक कायद्यांत दुरुस्ती करून, सध्यां ज्या तारणावर ती इतर बँकांना कर्जें देऊं शकतें त्या सेरीज इतर समाधानकारक तारणावरहि तिला कर्जें देतां यावी, अशी तरतूद करण्यांत येत आहे.

#### ताळेबंद व नफातोटा पत्रक

बँकांचा ताळेबंद व नफातोटा पत्रक ह्यांत सिलेक्ट कमिटीनें बऱ्याच दुरुस्त्या सुचविल्या आहेत. त्यांचा उद्देश ह्या हिशेबाच्या पत्रकांनीं कंपन्यांची खरी वस्तुस्थिति दाखवावी असा आहे. ह्या पत्रकांतील दुरुस्त्या फारच महत्त्वाच्या आणि बँकांच्या व्यवहारावर परिणामकारक असल्यानें, त्यांचा परामर्श स्वतंत्रपणेंच घेणें जरूर आहे.

## स्फुट विचार

### हिंदुस्थानचें औद्योगीकरण

नवी दिल्ली येथें अखिल भारतीय कारखानदार संघाच्या सातव्या अधिवेशनचा उद्घाटन समारंभ पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें झाला. या प्रसंगीं पंडितजींनीं केलेलें भाषण आणि अध्यक्ष सर एम्. विश्वेश्वर अय्या यांनीं केलेलें भाषण हीं एकमेकांना पूरक अशीं झालीं. मध्यवर्ती सरकारचे उपाध्यक्ष म्हणून पंडितजींच्या भाषणाला सरकारी धोरणाच्या दृष्टीनें महत्त्व होतें आणि उद्योगधंद्यांच्या विकासासंबंधीं तांत्रिक तज्ज्ञ म्हणून सर विश्वेश्वर अय्या यांचेंहि भाषण तितकेंच किंबहुना थोड्या अधिकच महत्त्वाचें होतें. पंडितजींनीं आपल्या भाषणांत धंद्यांच्या राष्ट्रीयीकरणासंबंधीं मत व्यक्त करतांना दाखविलेला संयम दूरदृष्टीचा आहे. पण त्याच बरोबर त्यांनीं आणखीहि एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधण्याचें कार्य केलें आहे. हिंदुस्थानचें औद्योगीकरण झपाट्यानें म्हणजे सुमारें १०-१२ वर्षांत झालें पाहिजे असें सांगून पंडितजी पुढें म्हणतात कीं, इतर देशांचें औद्योगीकरण होतांना समाजांत जशी अनिष्ट उलथापालथ झाली ती टाळली गेली पाहिजे. औद्योगीकरणाचे भयंकर सामाजिक दुष्परिणाम टाळण्यासाठी पंडितजींनीं दिलेला हा इषारा बहुमोल आहे. इंग्लंड-अमेरिकेसारख्या दोनशें वर्षें पुढें असलेल्या देशांना या बाबतींत लवकर गांठावयाचें आणि अनियंत्रित औद्योगीकरणाचे अनिष्ट सामाजिक परिणाम मात्र टाळावयाचे असा हा अवघड पेच आहे. पण तत्त्व आणि व्यवहार यांची सांगड घातली तर हें दिव्य करून दाखविणें अशक्य नाहीं. अध्यक्ष सर विश्वेश्वर अय्या यांनीं पंचवार्षिक औद्योगीकरणासंबंधीं पुढील चार महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. (१) यंत्रें तयार करण्यासाठी लागणाऱ्या अवजड यंत्रसामुग्रीच्या मोठ्या कारखान्याची उभारणी, (२) यंत्रशास्त्रविषयींत प्रवीण लोक तयार करण्यासाठी संस्थांची स्थापना, (३) स्थापत्य शास्त्रज्ञ, रसायनशास्त्रज्ञ आणि इतर तज्ज्ञ यांच्या सल्लागार मंडळांची स्थापना आणि (४) निदान तीन वर्षेपर्यंत तरी सरकारी मदत आणि सहकार्य. सर विश्वेश्वर अय्यांनीं सुचविल्याप्रमाणें दरवर्षी ३०० ते ५०० कोटी रुपये योजनाबद्ध रीतीनें गुंतविले गेले तर हिंदुस्थानचें औद्योगीकरण मार्गी लागलें असें म्हणता येईल.

---

### अन्नधान्याच्या परिस्थितींत सुधारणा

मध्यवर्ती सरकारचे अन्नखात्याचे मंत्रि डॉ. राजेंद्र प्रसाद नुकतेच मुंबईला आले होते. त्या समयीं त्यांनीं मुंबई सरकारशीं देशांतील अन्नधान्याच्या पुरवठ्यासंबंधीं विचारविनिमय करून कांहीं माहितीहि पुरविली. त्यांनीं सांगितलेल्या माहितीप्रमाणें हिंदुस्थानांत चालू वर्षांतहि ३० ते ४० लाख टन इतका अन्नधान्याचा तुटवडा असून बाहेरच्या देशांतून आयात होणारें धान्यहि गेल्या सालापेक्षां कमीच येणार आहे. गेल्या वर्षी एकूण आयात २३ लाख टनांच्या आसपास झाली होती. यंदा मुख्यतः तांदूळ पिकविणाऱ्या प्रांतांतून पीक बरें आहे; परंतु सिंध, पंजाब व मध्यप्रांत या प्रांतांतून तांदुळाचें पीक असावें तसें नाहीं. पंजाब आणि सिंधमधील गव्हाचें पीक साधारण बरें असलें तरी इतर प्रांतांतून तें तितकेसें चांगलें नाहीं. अशा परिस्थितींत अन्नधान्याच्या


दि

# न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

**हेड ऑफिसः—१६ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई.**

शेअर भांडवल व गंगाजळी ... रु. ११,०४,००० चे वर
एकूण खेळतें भांडवल ... रु. ३,३०,००,००० चे वर

—स्थानिक शाखा—

१ दादर २ गिरगांव ३ ग्रँट रोड ४ जव्हेरी बझार ५ माटुंगा ६ शीव ७ विलेपार्ले

—बाहेरगांवांतील शाखा—

८ अहमदाबाद ९ अहमदनगर १० अमरावती ११ अकोला १२ बडनेरा १३ बेळगांव १४ चांदा १५ धुळें १६ दिल्ली १७ न्यू दिल्ली १८ देवळाली १९ गुरगांव २० इचलकरंजी २१ जळगांव २२ कारंजा २३ कोल्हापूर २४ कोल्हापूर (शाहुपुरी) २५ कोपरगांव २६ लोणंद २७ महाड २८ मालेगांव २९ मिरज ३० मूर्तिजापूर ३१ नागपूर (इतवारी) ३२ नागपूर (सिताबर्डी) ३३ नामपूर ३४ नंदूरबार ३५ नाशिक सिटी ३६ नाशिक रोड ३७ पंढरपूर ३८ पेण ३९ पुना सिटी ४० पिंपळगांव ४१ संगमनेर ४२ सांगली ४३ सोलापूर ४४ शहापूर ४५ शिवाजीनगर (पुणें) ४६ सिन्नर ४७ यवतमाळ.

**आपल्या पैशाच्या सुरक्षित वाढीसाठी आपल्या स्वतःच्या बँकेशीं व्यवहार करा.**

*सर्व तऱ्हेचे आधुनिक बँकिंग व्यवहार केले जातात.*

डी. एन. गडेकर
मॅनेजर, पुणें शाखा
बुधवार चौक

डी. डी. देशपांडे
मॅनेजिंग डायरेक्टर

बाबतींत चिंता करण्याचें कारण नसलें तरी सुटकेचा विश्वास टाकता येण्याइतकी ती सुधारलेलीहि नाहीं. तेव्हां स्वावलंबी बनून देशांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें येवढाच निश्चित उपाय हातीं आहे. मध्यवर्ती सरकारच्या त्या दृष्टीनें योजनाहि आहेत. येत्या चारपांच वर्षांत अन्नधान्याची टंचाई दूर करण्याच्या हेतूनें या योजना आखण्यांत आलेल्या आहेत. त्यांत नद्यावरलि धरणें, दूधपुरवठा व गुरें यांची वाढ, कोंबड्यांच्या व मच्छीमारीच्या धंद्यांची वाढ इत्यादींचा समावेश आहे. याशिवाय अन्नधान्याच्या साठ्यासाठीं गुदामें बांधण्याचेंहि काम कांहीं ठिकाणीं चालू झालेलें आहे. सरकारी प्रयत्नाबरोबरच लोकांनींहि स्वतःच्या प्रयत्नाला योग्य दिशा लावून सरकारशीं सहकार्य केलें पाहिजे. या बाबतींत अन्नमंत्र्यांनीं केलेल्या सुचना अमलांत आणल्या गेल्या पाहिजेत. ज्या जमिनींत जें पीक चांगलें येतें त्या जमिनींत तेंच पेरलें पाहिजे ही मूलग्राही बाब असल्यामुळें ज्या जमिनींत अन्नधान्य पिकण्यासारखें असेल तेथें बाजारांत भाव येतो म्हणून दुसरें पीक काढतां कामा नये. अशा प्रकारच्या सूचनांची अंमलबजावणी केली गेली आणि प्रांतिक सरकारांचें सहकार्य लाभलें तर टंचाईची अन्नधान्य–परिस्थिति सुधारेल यांत शंका नाहीं.

---

### हिंदुस्थानची दर्यावर्दी वहातूक

हिंदुस्थानच्या समुद्रावरील वहातुकीचा व्याप वाढविण्यासाठीं हिंदी दर्यावर्दी वहातुक करणाऱ्यांचे प्रतिनिधी मे महिन्याच्या अखेरीस लंडनला जाणार आहेत. त्यावेळीं ब्रिटिश सरकार आणि ब्रिटिश दर्या वहातुकीचे प्रतिनिधी यांच्या बरोबर विचार–विनिमय करून हिंदुस्थानची दर्यावरील वहातूक वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. हिंदुस्थानचा ४ हजार मैल लांबीचा किनारा, हिंदी महासागरांतील हिंदुस्थानचें लष्करी व व्यापारी महत्त्व, इत्यादी बाबी लक्षांत घेतां, हिंदुस्थानला आपले स्वतःचे असे लष्करी व व्यापारी बोटींचे तांडे किती आवश्यक आहेत हें चटकन लक्षांत येतें. हिंदी जहाज बांधण्याचा धंदा ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील आगमनाच्या वेळीं किती पुढारलेला होता, तो परकीय राज्यकर्त्यांनीं कसा बुडविला इत्यादी इतिहास प्रसिद्धच आहे. तथापि, त्याला आतां केवळ ऐतिहासिक महत्त्वच राहिलें असल्यानें भविष्यकालासंबंधी हिंदुस्थान सरकारच्या जहाज–विषयक कमिटीनें केलेल्या शिफारसीकडेंच अधिक लक्ष द्यावयास हवें. कमिटीच्या मुख्य शिफारसींचा गोषवारा पुढील प्रमाणें आहे:— (१) हिंदी नागरिकांच्या मालकीचीं, त्यांच्या नियंत्रणाखालीं असलेलीं आणि त्यांनीं चालविलेलीं जहाजेंच हिंदी बोटींच्या धंद्यांत समाविष्ट करण्यांत यावीं. (२) येत्या ५ ते ७ वर्षांत हिंदुस्थानच्या किनाऱ्यानें चालणारा १०० टक्के व्यापार; ब्रम्हदेश, सीलोन व इतर जवळचे देश याच्याशीं चालणारा ७५ टक्के व्यापार; लांबच्या पल्ल्याच्या व्यापारापैकी शेकडा ५० टक्के आणि फॅसिस्ट राष्ट्रांच्या बोटींच्याद्वारा चालणाऱ्या युद्धपूर्व व्यापारापैकी ३० टक्के व्यापार हिंदी जहाजांतुन करण्याचें ध्येय ठेवावें. (३) इतका व्यापार पार पाडावयाचा तर त्यासाठीं एकूण २० लाख टन वजनाच्या बोटी लागतील. त्या साधारणपणें दरवर्षी १ कोटी टन माल आणि ३० लाख उतारू इतकी वहातूक करूं शकतील. (४) मक्तेदारी पद्धतीनें वहातुकीची वाटणी करण्यांत येऊं नये. (५) सरकारच्या वहातूक खात्याकडून पोर्ट ट्रस्टस् काढून घेऊन ते व्यापार खात्यानें आपल्या ताब्यात घ्यावे. कमिटीनें केलेल्या या व इतर शिफारसी अमलांत आल्या तर हिंदुस्थानची दर्यावर्दी वहातूक झपाट्यानें वाढेल यांत शंका नाहीं.


दि

## ट्रिनिटी मेटल वर्क्स लि. मुंबई

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल

**रु. ५,००,००० पांच लक्ष**

संचालक मंडळ

(१) चेअरमन—दि. ब. मोतीलाल बालमुकुंद मुथा, सातारा. (२) डायरेक्टर बोर्डाचे उपाध्यक्ष— श्री. शि. शं. सक्री, बागलकोट. (३) कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष—श्री. मा. ग. देसाई, मुंबई. (४) शेट अबीदिन एस. तयबजी, मुंबई. (५) श्री. अ. बा. पाटील, कोल्हापूर. (६) श्री. त्र्यं. य. फडके, मुंबई. (७) श्री. मा. रा. जोशी, पुणें. (८) श्री. ग. स. वैद्य, पुणें. (९) श्री. ल. बा. कोकणे, मुंबई (एक्स ऑफीशिओ) (१०) श्री. स. धों. चव्हाण, मुंबई (एक्स ऑफिशिओ) (११) श्री. व. न. म्हैसूर (एक्स ऑफिशिओ).

पत्र्याचे डबे तयार करणाऱ्या ट्रिनिटीचें उज्वल भवितव्य

● लहान मोठ्या आकाराचे पत्र्याचे डबे करणाऱ्या ट्रिनिटी मेटल वर्क्सचें लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें असून सध्या रोजीं सुमारें दहा हजार डबे या कारखान्यांत तयार होत आहेत. युद्धोत्तर उद्योगधंद्यांच्या गरजा लक्षांत घेतां पॅकिंगसाठीं पत्र्याचे डबे अद्ययावत् पद्धतीनें करणारा कारखाना किफायतशीर ठरणार असून पहिल्याच वर्षीं सहा टक्के नफा भागीदारांना वाटतां येईल अशी संचालक मंडळास खात्री वाटते.

● सहा टक्के नफा भागीदारांना देतां आला नाहीं तर मॅनेजिंग एजन्सीचा पगार त्या प्रमाणांत कमी घेण्याचें मॅनेजिंग एजंटांनीं कबूल केलें आहे.

● कंपनी कोल्हापूर, खानदेश, गुजराथ, या भागांतून वरील मालाचे उत्पादनासाठीं सबसीडीअरी कंपनी काढणार असून सरकारकडे २५ लक्ष रु. चें भांडवल उभें करण्यास परवानगी मागणार आहे.

● एकंदर भांडवल रु. १०० च्या एकूण पांच हजार आर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें असून त्यापैकीं डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंटस, त्यांचे स्नेही व हितचिंतक यांनीं तीन लक्ष बासष्ट हजार रु. चे शेअर्स विकत घेतले असून बाकीचे एक लक्ष अडतीस हजाराचे शेअर्स विक्रीसाठीं बाहेर काढले आहेत. अर्जासोबत रु. ५० प्रत्येक शेअरसाठीं, ॲलॉटमेंट नंतर रु. ३० प्रत्येक शेअरसाठीं, बाकीचे तसेच शेअर मागें रु. २० ॲलॉटमेंटनंतर दोन महिन्यांनीं बोर्डास योग्य वाटल्यास मागण्याचा अधिकार आहे.

शेअरसाठीं करावयाचे अर्ज, माहिती पत्रक वगैरेसाठीं कंपनीचे पत्त्यावर अथवा श्री. व्ही. एन. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी., मॅनेजर, सुप्रीम म्युच्युअल विमा कंपनी लि., ८६६ सदाशिव पेठ, पुणें २ यांचेकडे पत्रव्यवहार करावा.

मेसर्स कोकणे, म्हैसूर आणि कंपनी
मॅनेजिंग एजंटस.

रजिस्टर्ड ऑफिस, ३६२ अ. विठ्ठल भाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई ४.

व्याज-वजा

# मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव — फिनले रु. १५ दि. २५।४।४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १५।४।४७ | बुधवार १६।४।४७ | गुरुवार १७।४।४७ | शुक्रवार १८।४।४७ | सोमवार २१।४।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २११७-८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २०९५ | २१४५ | २१४६-४ | २१६० | २१५५ |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३८८ | ३९५ | ३९२ | ३९९ | ४०० |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २५-१२ | २६-१२ | २८-४ | २७-१० | २७४ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३४-६ | ३५-४ | ३६ ६ | ३५-१० | ३५-४ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| २६७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०७० | ११९० | ११०५ | ११०७-८ | ११९० |
| ११८२; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५८१ | ५९७ | ५९७ | ६०५ | ६१७ |
| ९१९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५६५ | ५८५ | ५८२ | ५९५ | ५९० |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २७७ | २८५ | २८३ | २८३ | २८३ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | २९७ | ३०७ | ३०८ | ३१९ | ३०९ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २८४ | २९५ | २९७ | २९८ | २९६ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २९५ | ३०४ | ३०३ | ३०८ | ३०७ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-२-६ | ४-३ | ४-४ | ४-४-६ | ४-४ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-४ | १५-१० | १५-१४ | १५ ११ | १५-१० |
| ६-११ ६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३-४ | ३-४ | ३-४ ६ | ३-४-६ | ३-४ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५७२-८ | ५८२-८ | ५९५ | ५९६-४ | ५९० |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७४-८ | १७८-८ | १७९-८ | १७९-८ | १७९-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४५ | २४८ | २५२ | २४२ | २५२ |
| ९१८; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४४८-१२ | ४७५ | ४६२-८ | ४६७-८ | ४६५ |
| ६०-१० ३६-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३१-१४ | ३२-१४ | ३३-४ | ३३-२ | ३२-१० |

**जेकॉप एन्जिनिअर्स लि., पुणें**—जनरल इलेक्ट्रिक कंपनीचे नांवानें, महाराष्ट्र कारखानदार संघाचे सेक्रेटरी श्री.एच. व्ही. काणे, बी. एससी., ए. एम्. आय. ई., एम. आय. एम. इ. ए. ह्यांचें चालू असलेलें वर्कशॉप घेऊन धंदा चालविण्यासाठी वरील कंपनी स्थापन झाली आहे. तज्ज्ञांच्या मूल्यमापनास अनुसरून श्री. काणे ह्यांचें वर्कशॉप व गुडविल ६७ हजार रुपयांस विकत घेण्यांत येईल आणि त्यापैकी ५० हजारांचे त्यांस पूर्ण भरणा झालेले शेअर्स दिले जातील. मेसर्स एच. व्ही. काणे आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी राहील. डायरेक्टरांनीं प्रत्येकीं ५ हजारांचे भाग घेतले आहेत. सांगलीचे श्री. विष्णु रामचंद्र वेलणकर हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून श्री. एल. जी. विंझे, डॉ. डी. जी. काणे, श्री. एस. व्ही. सोवनी, डॉ. पी. व्ही. काणे, श्री. एन. एस. गोडबोले, श्री. पी. के. साठे, श्री. व्ही. एऊ. कुंटे व श्री. एन. पी. केळकर ही मंडळी बोर्डावर आहेत. कंपनीच्या भांडवलांत ५% रि. क्यु. प्रेफरन्स, डिफर्ड व ऑर्डिनरी शेअर्स आहेत.

**श्री शिवाजी बँक लि., कोल्हापूर**

१९४६ सालीं वरील बँकेनें मागील सालापेक्षा जवळ जवळ दुप्पट म्हणजे ७,८४७ रु. नफा मिळविला. त्यांतील १,५७० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून भागीदारांस प्रत्येक १० रुपयांच्या शेअरवर १० आणे करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी २,९१० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेचें वसूल भांडवल सुमारें ४७,००० रु. असून तिचेकडे ५½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. शिंदगीचे बाजूस २½ लक्ष रु. रोख व बँकेंत; १ लक्ष, ४० हजार रु. डिस्कौंट केलेलीं बिलें व २ लक्ष, २८ हजार रु. कर्जें असा तपशील आहे. एकूण खेळतें भांडवल ६ लक्ष रुपयांवर गेलें आहे. श्री. द. रा. पाटगांवकर हे बँकेचे चेअरमन असून श्री. ना. ह. साळुंखे हे मॅ. डायरेक्टर आहेत.


-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें-प्रदर्शनांतील स्टॉल नं. १४० पहाण्यास विसरूं नका.









**धूम्रपान महाग करून डॉलर वांचविणार**

ब्रिटिश फडणवीस डॉ. डाल्टन ह्यांनीं कॉमन्स सभेस आपल्या सरकारचें १९४७-४८ चें अंदाजपत्रक गेल्या आठवड्यांत सादर केलें. ह्या वर्षी खर्चापेक्षां उत्पन्न २५ कोटि पौंड अधिक भरेल, अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षीच्या हिशेबांत ७३ कोटि पौंडांची तूट येईल अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्ष तूट ५७ कोटींचे वर गेलेली नाहीं. गेल्या वर्षीचे मानानें चालू वर्षी खर्च १९% कमी होईल आणि लष्करी खर्च तर ४६% नें उतरेलें, अशी अपेक्षा आहे. त्यापुढील वर्षांत तो त्याहूनहि खाली जाईल. ग्रेट ब्रिटनमधील रहाणीच्या खर्चाचें मान भरमसाट वाढूं नये, ह्यासाठीं तेथील सरकार अन्न व इतर रोजच्या अत्यावश्यक गरजेच्या जिनसांसाठीं स्वतः खर्च करून त्यांची किंमत मर्यादेंत राखते. येत्या वर्षी अशा खर्चाची रकम ४३ कोटि पौंडांवर जाणार आहे. ह्या वाढत्या खर्चाबाबत काळजीपूर्वक फेरविचार करण्याची वेळ आली आहे, असें डॉ. डाल्टन यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. एकूण अपेक्षित खर्च ३१८ कोटि पौंड असून अपेक्षित उत्पन्न ३४३ कोटि पौंड भरेल. अंदाजपत्रकांतील वाढावा करभार फारसा हलका करण्यास उपयोगी पडणार नाहीं. कांहीं कर कमी केले आहेत तर कांहीं वाढवले आहेत, परंतु सर्वांत महात्त्वाची बाब म्हणजे आयात होणाऱ्या तंबाखूचे पानावरील जकातींत ५०% वाढ ही होय. ग्रेट ब्रिटनला लागणाऱ्या तंबाखूची किंमत डॉलर्समध्यें द्यावी लागते. हें वाढतें देणें शक्य तितकें कमी करणें अत्यावश्यक झालें असल्यामुळें सिगारेटस् महाग करणें नाइलाजानें भाग पडत आहे. जकात वाढविण्याचा उद्देश तंबाखू व सिगारेटस ह्यांचा खप कमी करणें हाच असून, वाढत्या जकातीचें येणारें मोठें उत्पन्न ही गौण बाब आहे. आज ग्रेट ब्रिटनमध्यें २० सिगारेट्सच्या पाकिटास २ शिलिंग ४ पेन्स पडतात; ह्यापुढें, त्याला ३ शिलिंग, ४ पेन्स पडूं लागतील. "आपणांस राष्ट्र ह्या दृष्टीनें जेवढें परवडेल, त्यापेक्षां जास्त धूम्रपान आपण करीत आहों; त्यास आळा घातलाच पाहिजे" असें डॉ. डाल्टन ह्यांनीं सांगितलें.

---

**ब्रिटनचें १९४७-४८ सालचें अंदाजपत्रक**—या अंदाजपत्रकांत आशीवरील करासंबंधी दिलेल्या सवलतीमुळें ७ लाख, ५० हजार नागरिकांना हा कर आतां भरावा लागणार नाहीं. तंबाकूच्या आयातीवरील कर वाढविल्यामुळें २० सिगारेटच्या पेटीला २ शिलिंग ४ पेन्स ऐवजीं ३ शिलिंग ४ पेन्स किंमत द्यावी लागेल. अंदाजपत्रक वाढाव्याचें आहे.

**विजगापट्टम् बंदराची सुधारणा**—विजगापट्टम् बंदराची पुनर्घटना करून त्यांत निदान ६५० फूट लांबीचीं जहाजें रहातील अशी व्यवस्था करण्यांत यावी, अशी शिफारस हिंदुस्थान सरकारच्या बंदर कमिटीनें केली आहे. सरकारनें शिफारसीचा स्वीकार केला आहे.

**मध्यपूर्वेबाबत मि. वालेस यांची सूचना**—तैग्रीस युफ्रेटिसच्या दरम्यान पसरलेल्या वाळवंटांत अमेरिकेनें आपले टेनेसी व्हॅली तंत्र आणलें तर त्याचें नंदनवन बनवितां येईल असे उद्गार मि. वालेस यांनीं इंग्लंडमध्यें बोलतांना काढले.

**ब्रिटनचें रेडिओ नियंत्रित अस्त्र** — रेडिआनें नियंत्रित होणारें ब्रिटनचें पहिलें रॉकेट तयार होऊन त्यासंबंधी प्राथमिक प्रयोगही झाले. या रॉकेटची गति दर तासाला ५०० मैल असूं शकेल.

**सोन्याची चोरटी आयात**—दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणींतून सोन्याची चोरटी निर्यात होत असल्याचें आढळून आलें आहे. यापैकीं बरेंच सोनें हिंदुस्थानांतील सोन्याच्या चढत्या भावामुळें हिंदुस्थानांत येतें असें म्हणतात.


"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A by an order of which a complete copy is open to public inspection at the Head Office of the Company. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any of the schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि०

## —पुणें—

**विक्रीस काढलेलें नवीन भांडवल रु. ७,००,०००**

**प्रत्येकीं रु. ५० च्या १४,००० भागांत विभागलेलें.**

★ वरील भाग ता. १४ फेब्रुवारी १९४७ रोजीं बँकेच्या पटावर असलेल्या भागीदारांना त्यांच्या प्रत्येक जुन्या २५ भागांना ७ नवीन भाग या प्रमाणांत प्रत्येकीं रुपये ५ वाढीनें देऊं केले आहेत.

★ भागीदारांनीं घेऊन शिल्लक राहिलेले भाग इतरांना तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील.

★ अर्ज बँकेच्या मुख्य कचेरींत पोहोंचण्याची शेवटची ता. १५ मे १९४७ ही आहे.

★ बँकेच्या शाखांत अर्ज ता. १०-५-१९४७ पर्यंतच स्वीकारले जातील.

★ अर्जाबरोबर पाठविणेची रक्कम रुपये ३० प्रत्येक भागाकरितां (रुपये २५ भांडवलापैकीं + रु. ५ वाढीचे).

**—संचालक मंडळ—**

श्री. धों. कु. साठे, अध्यक्ष.

| | |
|---|---|
| श्री. वा. पु. वर्दे | श्री. न. ग. पवार, |
| श्री. श्री. गो. मराठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. फ. दो. पदमजी | श्री. भा. वि. शहा. |
| श्री. शं. ल. किर्लोस्कर | श्री. भा. म. गुप्ते. |

श्री. मो. रा. हमदेरे

**सी. व्ही. जोग,**

मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.